# जीवनाचा उद्देश

| | | |
|---|---|---|
| पुस्तकाचे नाव | :- | जीवनाचा उद्देश |
| लेखक | :- | पद्मभूषण मौलाना वहीदुद्दीन खान |
| प्रकाशन वर्ष | :- | मे २०११ |
| टाइपसेटिंग | :- | चाऊस प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे-३०. |
| मुद्रणस्थळ | :- | आदर्श प्रिंटिंग ॲन्ड पॅकिजिंग प्रॉडक्ट्स्, सीताबर्डी, नागपूर. |
| प्रकाशकाचा पत्ता | :- | चाऊस प्रकाशन, १४१४/१अ, ट्रियो चेंबर्स, रेणूका स्वरूप शाळेच्या बाजूला, सदाशिवपेठ, पुणे - ३०. फोन : (०२०) २४४९८७६५. |

E-mail : info@chausbooks.com ● Website : www.chausbooks.com

(इंग्रजी, हिंदी, उर्दू व इतर काही भाषांत सुद्धा हे पुस्तक उपलब्ध आहे.)

*Marathi translation edited by*
*Jyoti Aphale*

***This booklet does not carry a copyright.***
***You can publish it and distribute it without prior permission of the publisher.***

***Student's Name :*** ______________________

# जीवनाचा उद्देश

१. माणसाचं भवितव्य पृष्ठ क्र. ०४
२. जीवनाचा उद्देश पृष्ठ क्र. १५
३. स्वर्ग आणि माणूस पृष्ठ क्र. २६

# माणसाचं भवितव्य

पृथ्वी या ग्रहाला कधीच न पाहिलेली एक व्यक्ती एका वेगवान अंतराळयानात पूर्ण ब्रम्हांडाची यात्रा करून पहिल्यांदा पृथ्वीवर आली तर ती पृथ्वी पाहून अचानक स्तब्ध होऊन जाईल. कारण या विशाल ब्रम्हांडामध्ये पृथ्वी केवळ एकमेव अपवाद आहे जिची वैशिष्ट्ये इतरांपेक्षा वेगळी आहेत. या विशाल ब्रम्हांडात एक तर नक्षत्र आहेत जेथे फक्त आग आहे किंवा असे ग्रह फिरत आहेत जे केवळ खडकांनी भरलेले आहेत. केवळ पृथ्वीच असा एक ग्रह आहे जेथे अपवादात्मक स्वरूपात माणसासारख्या निर्मितीस जगता येणाऱ्या सर्व गोष्टी उपलब्ध आहेत. ज्यांना विज्ञानाच्या भाषेत Life Support System (जीवन साहाय्य यंत्रणा / जीवन जगण्यासाठी अनुकूल असलेली व्यवस्था) म्हटले जाते.

प्रत्येक व्यक्ती या पृथ्वी नावाच्या ग्रहावर जन्म घेते आणि आपले आयुष्य येथेच व्यतित करते. पण पृथ्वीच्या या अपवादात्मक आणि आश्चर्यजनक असण्याचा अनुभव तिला कधी होत नाही. कारण ती जन्मल्यापासून पृथ्वीला पाहत आलेली असते. अशा प्रकारे दररोज पाहतापाहता ती या पृथ्वीशी इतकी रुळते की पृथ्वीचा हा अपवादात्मक वेगळेपणा तिच्या नजरेतून नाहीसा होऊन जातो. असं जर नसतं तर दररोज सकाळी पृथ्वी पाहून प्रत्येक व्यक्तीने उद्गार काढला असता – 'किती सुंदर आहे ही पृथ्वी! किती परिपूर्ण आहे हे जग!'

पृथ्वीवर मानवी जीवनास साहाय्य करणारी ही व्यवस्था नेहमीपासूनच होती. परंतु वर्तमान काळातील विज्ञानाच्या संशोधनांनी पृथ्वीच्या या

आगळ्यावेगळ्या वैशिष्ट्याला हजारो पटींनी मोठ्या स्तरावर लोकांसमोर आणून ठेवलेलं आहे. पृथ्वीवरील या जीवन साहाय्य यंत्रणेला आजची व्यक्ती ज्या प्रमाणात समजू शकते त्या प्रमाणात आधीची व्यक्ती कधीच समजू शकली नव्हती.

जीवन साहाय्य यंत्रणा काय आहे? ही एक भेट आहे जी देणाऱ्याने माणसाला दिलेली आहे. अशा अवस्थेत माणसासाठी हे आवश्यक होतं की त्याने ही भेट देणाऱ्याला ओळखावं आणि त्याने दिलेल्या भेटीच्या उत्तरात त्याचा स्वीकार करावा. आपल्या बुद्धी व अंतःकरणाने त्यासमोर नतमस्तक व्हावे. माणसाने हे ओळखण्याचा प्रयत्न करायला पाहिजे होता की देणाऱ्याने त्याला ही विशिष्ट भेट का दिलेली आहे? मग देणाऱ्याच्या उद्देशानुसार त्याने मिळालेल्या भेटीचा वापर करायला पाहिजे होता. त्या उद्देशानुसार जीवन व्यतित करायला पाहिजे होतं.

पण असं होऊ शकलं नाही. माणूस या पृथ्वीवर जीवन व्यतीत करतो. तो आपल्यासाठी येथे एका समाजाची निर्मिती करतो. तो येथे आपल्या व आपल्या मुलाबाळांसाठी शानदार भवितव्य उभारण्याचा प्रयत्न करतो. पण जीवन साहाय्य यंत्रणेच्या या असाधारण व्यवस्थेची निर्मिती कोणी केली आणि या निर्मात्याला याच्या मोबदल्यात माणसाकडून काय अपेक्षित आहे हे जाणण्याचा प्रयत्न करावा हा विचार कधी त्याच्या मनात येत नाही.

खरं म्हणजे या जगात प्रत्येक गोष्टीच्या दोन बाजू आहेत. त्या गोष्टीचा उचित वापर किंवा अनुचित वापर. जसे निर्मात्याने पृथ्वीवर लोखंडाची निर्मिती केली. लोखंडाचा एक वापर असा आहे की यापासून उपयुक्त यंत्र बनवले जावेत आणि लोखंडाचा दुसरा वापर असा आहे की यापासून विध्वंसक शस्त्र बनवले जावेत. यंत्र बनवणे लोखंडाचा उचित वापर करणे आहे तर शस्त्र बनवणे लोखंडाचा अनुचित वापर करणे आहे.

असंच उदाहरण आहे जीवन साहाय्य यंत्रणेचं. जीवन साहाय्य यंत्रणेचे सुद्धा दोन पैलू आहेत. एक म्हणजे तिला योग्य नजरेतून पाहणे आणि दुसरे

म्हणजे तिला चुकीच्या नजरेतून पाहणे. योग्य नजरेतून पाहणारा जीवन साहाय्य यंत्रणेच्या उचित वापराला ओळखेल. आणि चुकीच्या नजरेतून पाहणाऱ्याचा व्यवहार प्रत्येक प्रकारे चुकीचा व्यवहार राहील.

जीवन साहाय्य यंत्रणेच्या बाबतीत उचित आणि अनुचित दृष्टिकोन कोणता हे आपण कसं ठरवणार? हे ठरवण्याचं एकमेव माध्यम म्हणजे आपण पृथ्वीच्या निर्मात्याचा निर्मितीमागील काय उद्देश आहे हे लक्षात घेणे. या निर्माण योजनेद्वारेच हे कळेल की जीवन साहाय्य यंत्रणेबाबतीत आमची कोणती कृती उचित आहे आणि कोणती अनुचित.

प्रेषितांच्या माध्यमातून निर्मात्याने मानवी जीवनाबद्दलची त्याची जी निर्माण योजना सांगितली आहे ती म्हणजे त्याने माणसाला कधीच न संपणारी अशी चिरकालीन निर्मिती बनवलेलं आहे. मग त्याच्या आयुष्याच्या छोट्या भागाला मृत्युपूर्व जीवनात आणि उर्वरित भागाला मृत्यूनंतरच्या जीवनात विभागले आहे. मृत्युपूर्व जीवन परीक्षेचा काळ आहे. आणि मृत्युपश्चात जीवन परीक्षेनुसार मोबदला मिळविण्याचा काळ. जेव्हा मानवी इतिहासाची समाप्ती होईल त्या वेळेस मोठ्या प्रमाणावर एक न्यायदानाचा दिवस स्थापित केला जाईल. मानवांचा निर्माता प्रकट होईल आणि सर्व लोकांना त्यांनी केलेल्या कृत्यांच्या त्याच्या जवळील नोंदीनुसार बक्षीस किंवा दंड देईल. बक्षीस मिळविणाऱ्या लोकांसाठी शाश्वत स्वर्ग आहे आणि शिक्षा मिळविणाऱ्या लोकांसाठी शाश्वत नरक.

ईश्वराची ही निर्मिती योजना लक्षात घेऊन आपण हे समजू शकतो की जीवन साहाय्य यंत्रणेच्या बाबतीत माणसाचं आचरण कसं असलं पाहिजे. जीवन साहाय्य यंत्रणेकडे उचित दृष्टिकोनातून पाहणे म्हणजे निर्मात्याच्या नजरेतून पाहणे आहे. हीच ती गोष्ट आहे जी माणसाच्या या जीवनातील आचरणाला योग्य किंवा अयोग्य बनवते.

या दृष्टिकोनातून पाहिल्यास जीवन साहाय्य यंत्रणेच्या बाबतीत दोन भिन्न आचरण बनतात. निर्मात्याच्या योजनेनुसार जे आचरण बनेल ते म्हणजे

या यंत्रणेला परीक्षा साहाय्य यंत्रणा असल्याप्रमाणे घेणे. याविरुद्ध माणसाच्या नजरेतून पाहिल्यास ती केवळ मौजमजा साहाय्य यंत्रणा बनून राहते. पहिल्या अवस्थेत मानवी जीवन म्हणजे एक जबाबदारी असल्याचे आढळते तर दुसऱ्या अवस्थेत जीवनाचा उद्देश केवळ जनावरांच्या पातळीचा होऊन जातो. जणू काही खा – प्या – मजा करा – आणि अशाच अवस्थेत मरा.

अलीकडील वैज्ञानिक संशोधनांमुळे मानवी जीवन आणि जीवन साहाय्य यंत्रणा यांचं महत्त्व नेहमीपेक्षा मोठ्या प्रमाणात उघडकीस आलं आहे. याच्या परिणामस्वरूपात खरं तर माणूस जीवनाच्या उद्देशासंबंधी अधिक गंभीर व्हायला पाहिजे होता. पण परिणाम पूर्णपणे या विरुद्ध राहिला. माणूस या वास्तविकतेला विसरला की जीवन साहाय्य यंत्रणा मुळात परीक्षा साहाय्य यंत्रणा आहे. त्याने जीवन साहाय्य यंत्रणेला मौजमजा साहाय्य यंत्रणा मानलं. आणि मग जीवनाचा उद्देश केवळ हाच बनून राहिला की अधिकाधिक भौतिक गोष्टी प्राप्त करा व जीवनाला अधिकाधिक आनंदमयी बनवा.

येथे मला एक गोष्ट आठवते. ही गोष्ट सध्याच्या स्थितीला अधिक चांगल्या प्रकारे स्पष्ट करणारी आहे. सुमारे १९७२ मध्ये मी राजस्थानच्या एका भागात गेलो होतो. माझ्या या यात्रेत माझ्यासोबत माझे काही सहकारी होते. येथे एक निर्जन पर्वत होता. पर्वतावर जाण्यासाठी एक रस्ता बनवण्यात आलेला होता. आम्ही त्या पर्वतावर जाण्यासाठी निघालो. आमचा प्रवास जीपने झाला. जेव्हा आम्ही सगळे त्या पर्वतावर पोहोचलो तेथे एक विचित्र दृश्य आमच्या नजरेस पडले. या निर्जन भागात एक मोठी इमारत उभी होती. कदाचित एखाद्या राजाने ही इमारत उभारली असावी. ही इमारत आत्ता सुद्धा चांगल्या अवस्थेत होती. पण आम्हाला येथे एकही माणूस दिसला नाही. याउलट आम्ही पाहिलं की या इमारतीच्या आत व बाहेर हजारोंच्या संख्येत वानर होते. ते गोंधळ करते होते व इकडून तिकडे उड्या मारत होते. वानरांचं हे वैशिष्ट्य आहे की ते एखाद्या निर्जन स्थानावर कब्जा करून तेथे निरर्थक उड्या मारत असतात. यामुळे आम्हाला त्या इमारतीच्या आत जाता

आलं नाही. आम्ही ती बाहेरूनच पाहून परतलो.

मी तेथे उभा राहून बराच वेळ हे दृश्य पाहत होतो. मी विचार केला की येथे कब्जा केलेल्या वानरांचं या गोष्टीकडे लक्ष नाही की ही इमारत कोणी बनवली व बनविणाऱ्याचा उद्देश काय होता आणि त्या उद्देशाचा संबंध त्यांच्या उड्या मारण्याशी सुद्धा आहे का? या प्रश्नांपासून पूर्णपणे अजाण राहून ते येथे जे काही करत आहेत तो केवळ त्या इमारतीचा अपराधिक वापर आहे, इमारतीचा तो उचित वापर असू शकत नाही.

मग मी विचार केला वानरांकडून केला जात असलेला इमारतीचा हा अपराधिक वापर असाच सुरू राहील की या इमारतीचा मालक एक दिवस प्रत्यक्षात येईल आणि या वानरांना त्यांच्या अपराधिक कृत्याची शिक्षा देईल आणि या सुंदर इमारतीला त्या लोकांच्या स्वाधीन करून टाकेल ज्यांच्यासाठी ती बनवण्यात आली होती.

या उदाहरणावर विचार करा. बनविणाऱ्याने ही इमारत एका विशेष उद्देशाला समोर ठेवून बनविली होती. या इमारतीचा उचित वापर हा झाला असता की ती बनविणाऱ्याच्या उद्देशानुसारच वापरली जायला पाहिजे होती. पण याविरुद्ध झालं असं की उनाड वानरांनी तेथे कब्जा केला आणि त्या इमारतीचा वापर केवळ निरर्थक उड्या मारण्यात ते करू लागले.

हे उदाहरण अधिक मोठ्या स्तरावर सध्याच्या मानवी जगात घडत असल्याचे दिसत आहे. सध्याचा पृथ्वी हा ग्रह जणू मोठ्या व्यापक स्तरावर उपरोक्त इमारतीसमान बनलेला आहे. पूर्ण पृथ्वीची ही अवस्था आहे की सर्व स्त्री-पुरुष अत्यंत बेजबाबदारपणे येथे पसरलेले आहेत. ते या पृथ्वीकडे केवळ या उद्देशाने पाहतात की येथे त्यांच्या इच्छा आणि अभिलाषांची पूर्ती कशाप्रकारे होईल. ते या वास्तविकतेच्या बाबतीत कसलाच विचार करत नाहीत की ही पृथ्वी कोणी आणि का बनविली आहे.

असं का झालं? वर्तमानकाळात जेव्हा जेव्हा विज्ञानाने जीवनाला पूरक

असलेल्या गोष्टींचा अधिक मोठ्या स्तरावर शोध घेतला त्याच वेळेस आणखी एक घटना अस्तित्वात आली. ही घटना म्हणजे विभिन्न कारणांनी जगात विज्ञानाच्या स्तरावर आलेली एक नवीन संस्कृती. पण ही संस्कृती केवळ करमणूक संस्कृती होती. या करमणूक संस्कृतीच्या वातावरणात लोकांनी स्वतःहून असं ठरवून घेतलं की येथे असलेली प्रत्येक गोष्ट फक्त यासाठी आहे की मनुष्याने त्यापासून आनंद प्राप्त करावा. अर्थात जीवन साहाय्य यंत्रणा व्यावहारिक पातळीवर मौजमजा साहाय्य यंत्रणा बनली. पण हा बदल बौद्धिक पातळीवर नव्हता तर केवळ मनोरंजन संस्कृतीच्या उदयामुळे होता. परिणामतः मानवी समाज पशूतुल्य समाज बनला.

माणूस आणि पशू या दोघांत काय फरक आहे? तो असा आहे की पशू केवळ आपल्या स्वतःचा फायदा ओळखतो आणि माणूस फायद्याबरोबरच स्वतःची जबाबदारी सुद्धा ओळखतो. पण आजच्या जगात उघडपणे असं दिसून येतं की हे अंतर संपलेलं आहे. आजची मानव संस्कृती सुद्धा तीच आहे जी पशू संस्कृती आहे. वरवर दिसणारं अंतर सोडून दोघांमध्ये काहीही फरक राहिलेला नाही.

पण ही किरकोळ गोष्ट नाही. ही स्पष्टपणे निसर्गाने दर्शविलेल्या मार्गापासून दूर जाण्याची गोष्ट आहे. आणि निसर्गाचा मार्ग सोडणे म्हणजे स्वतःला दोन गोष्टींपासून वंचित करणे असते. मृत्युपूर्व जीवनात सुद्धा गमावणे आणि मृत्यूनंतरच्या जीवनात सुद्धा. माणूस त्याला मिळालेल्या स्वातंत्र्याचा चुकीचा वापर करून निसर्गनियमांकडे दुर्लक्ष तर करू शकतो पण त्याच्या परिणामांपासून स्वतःला वाचवण्याची त्याच्यात शक्ती नाही. हाच तो सगळ्यात मोठा धोका आहे ज्याचा आजचा माणूस सामना करत आहे.

मृत्युपूर्व जीवन काळात गमावणे म्हणजे काय गमावणे? याला प्रत्येक व्यक्ती स्वतः आपल्या वैयक्तिक अनुभवावरून ओळखू शकते. प्रत्येक माणसासमोर स्वतःसाठी एक आनंददायक ध्येय असते जेथे तो पोहोचू इच्छितो. तो आपला पूर्ण वेळ आणि पूर्ण शक्ती या ध्येयप्राप्तीसाठी वापरतो. पण

आपल्याला दिसतं की शेवटी प्रत्येकाच्या वाट्याला केवळ निराशा येत आहे. या जगात प्रत्येक व्यक्ती मग ती श्रीमंत असेल किंवा गरीब जेव्हा आपलं आयुष्य संपवून या जगातून जाते तेव्हा ती निराश व हताश होऊन जात असल्याचे आपल्याला दिसते. याला कोणत्याच स्त्री–पुरुषाचा अपवाद नाही.

असं का होतं? याचं कारण असं आहे की माणूस जो ध्येय प्राप्त करू इच्छितो त्याची साधने या जगात मुळात उपलब्धच नाहीत. सर्वकाही प्रयत्न करून जेव्हा तो एका स्थळावर पोहोचतो त्याला दिसतं की त्याला अपेक्षित असलेले इष्टस्थळ हे नाहीच. तो आपल्या ध्येयप्राप्तीमध्ये अयशस्वीच राहिला.

मानवी शरीरात विशेषत्वाने पाच गुण आढळतात. या गुणांना इंद्रिये म्हटले जाते. ही पाच इंद्रिये म्हणजे पाहणे, स्पर्श करणे, चव घेणे, वास घेणे आणि ऐकणे.

ही पाच इंद्रिये खरं म्हणजे पाच आनंद प्राप्तीची माध्यमे आहेत. या इंद्रियांत निर्मात्याने असीमित आनंद ठेवलेलं आहे. माणसासाठी पाहणे, स्पर्श करणे, चव घेणे, वास घेणे आणि ऐकणे हे सर्व अत्यंत आनंददायी अनुभव आहेत. या जगात दुसऱ्या निर्मितीत किंवा प्राण्यांमध्ये या इंद्रियांद्वारे आनंद घेण्याची योग्यता नाही. हे गुण केवळ माणसाबाबतच अपवादिक स्वरूपाचे वैशिष्ट्य ठेवतात की यांपासून तो एखाद्या गोष्टीचा अत्यंत सौम्य व कोमलतेने आनंद प्राप्त करू शकतो.

याच बरोबर माणसामध्ये सहावे इंद्रिय सुद्धा उपलब्ध आहे. हे सहावं इंद्रिय म्हणजे विचार करण्याची क्षमता. हे सहावं इंद्रिय माणसासाठी सर्वोत्तम आनंद प्राप्तीचं माध्यम आहे. ही एक वास्तविकता आहे की विचार करणे केवळ माणसाकडे असलेला विशेष गुण आहे. विचार करणे माणसासाठी अनंत आनंदाचं भांडार आहे. विचार करण्याची कृती प्रत्यक्षात दिसत नाही पण ती माणसाला उच्च कोटीचं आनंद देऊ शकते ज्याची प्राप्ती करणे इतर कोणत्याही माध्यमाने शक्य नाही.

याच बरोबर हे सुद्धा एक सत्य आहे की माणूस या आनंदांना अनुभवू तर शकतो पण या सध्याच्या जगात तो या आनंदांनी स्वतःचं पूर्णपणे समाधान करू शकत नाही. प्रत्येक व्यक्ती असीमित इच्छा आकांक्षांनी जन्म घेते आणि काही काळानंतर आपल्या इच्छा अपुऱ्याच ठेवून ती मरते.

याचा अर्थ असा आहे की या जगात माणसाकडे इच्छा आहेत. पण येथे त्याच्याकडे त्या इच्छापूर्तीची साधने उपलब्ध नाहीत. ही वास्तविकता या गोष्टीचा दृढ संकेत आहे की निर्मात्याच्या निर्माण योजनेनुसार या इच्छापूर्तीचं सामान मृत्युपूर्व जीवन काळात ठेवलेलंच नाही. तर ते मृत्युपश्चात जीवनात ठेवण्यात आलेलं आहे. या इच्छा माणसाला यासाठी दिल्या गेल्या आहेत की त्याने जीवनाच्या वास्तविकतेला समजावं आणि त्यानुसार जीवनाचं नियोजन करावं.

याबरोबरच या वास्तविकतेला सुद्धा समोर ठेवायला पाहिजे की माणसामध्ये उद्याचा (भविष्याचा) विचार आढळतो. पशू दिसायला सजीव प्राणी आहेत पण त्या कोणाहीमध्ये उद्याचं चित्र आढळत नाही. जनावरांची मर्यादित बुद्धी केवळ सध्याच्या गोष्टी ओळखते. ती भविष्याच्या कल्पनेपासून अजाण आहे. याउलट माणसामध्ये भविष्याची संकल्पना अत्यंत शक्तिशाली स्वरूपात उपलब्ध आहे. पण प्रत्येक माणसाचा व्यावहारिक अनुभव त्याला हे दाखवतो की सध्याच्या वर्तमान काळात हे अपेक्षित भविष्य त्याच्यासाठी मुळातच उपलब्ध नाही.

या वास्तविकतेमध्ये एक संकेत लपलेला आहे. हा संकेत माणसाला हे दाखवतो की त्याचं जे अपेक्षित भविष्य आहे ते सध्याच्या जगाच्या मर्यादांमुळे त्याच्या भाग्यात नाही. या अपेक्षित असलेल्या भविष्याला प्राप्त करण्यासाठी त्याला सध्याच्या जगात तयारी करायची आहे. यामुळे तो मृत्यूनंतरच्या जीवनात त्याचं अपेक्षित भविष्य प्राप्त करू शकेल.

सध्याच्या जीवनाची अवस्था एका परीक्षा कक्षाप्रमाणे आहे. परीक्षाकक्षात विद्यार्थ्यांच्या आवश्यक वस्तूंची मर्यादित उपलब्धी तर असते

पण त्याच्या सर्व इच्छांच्या पूर्तीची साधने तेथे उपलब्ध नसतात. म्हणून जो विद्यार्थी परीक्षाकक्षाला परीक्षाकक्ष या नजरेतून पाहील तो निराशेने ग्रस्त होणार नाही. पण जो विद्यार्थी परीक्षाकक्षास आपल्या इच्छापूर्तीचं स्थान समजेल त्याला तेथे निराशेशिवाय आणखी काहीही मिळणार नाही.

निर्मात्याच्या निर्माण योजनेनुसार सध्याचं जग परीक्षेसाठी बनवण्यात आलेलं आहे. येथे उपलब्ध असलेली जीवन साहाय्य यंत्रणा केवळ तेवढीच आहे जेवढी परीक्षेच्या उद्देशाने आवश्यक आहे. आता जे लोक या जगास परीक्षेचं मैदान समजतील आणि त्यानुसार आपले जीवन व्यतित करतील त्यांच्यामध्ये कधीच निराशेची मानसिकता निर्माण होणार नाही. पण जे लोक सध्याच्या जगास आपल्या अभिलाषा पूर्तीचं स्थान समजतील त्यांच्या पदरी घोर निराशाच येईल. कारण त्यांना जे काही हवं होतं त्याच्या पूर्तीची व्यवस्था निर्मात्याच्या निर्मिती योजनेनुसार येथे केली गेलेलीच नव्हती.

सध्याच्या पृथ्वी या ग्रहावर जीवनाचा उचित आणि यशस्वी मार्ग हाच आहे की माणसाने ईश्वराच्या निर्माण योजनेनुसार या जगाला आनंदस्थळ समजू नये तर त्याने याला परीक्षास्थळ समजावे. अशी व्यक्ती निर्मात्याच्या निर्माण योजनेनुसार जीवन जगेल. आणि परिणामस्वरूप अनंत यश प्राप्त करेल.

परीक्षेच्या स्वभावामुळे बनणारे जीवन करमणुकीच्या स्वभावामुळे बनणाऱ्या जीवनापेक्षा पूर्णपणे भिन्न असते. दोघांचं स्वरूप एकमेकांच्या अगदी उलट असते. काही उदाहरणांवरून दोघांमधील हे अंतर अधिक स्पष्ट होईल.

या बाबतीत मूळ अंतर वैचारिक पातळीवर आहे. परीक्षेचा स्वभाव बाळगणाऱ्या व्यक्तीमध्ये निर्माताकेंद्रित विचार निर्माण होतात. तो प्रत्येक बाबतीत हे ओळखण्याचा प्रयत्न करू लागतो की निर्मात्याच्या दृष्टिकोनातून त्याला काय केले पाहिजे आणि काय नको. या विपरीत मौजमजेचा स्वभाव बाळगणाऱ्या व्यक्तीमध्ये स्वकेंद्रित विचार निर्माण होतात. तो स्वतःला केवळ त्याच्या इच्छांचा बांधील समजू लागतो. आपल्याला सोडून दुसऱ्या कोणत्या अस्तित्वाच्या इच्छेच्या तो बंधनात नसतो.

परीक्षेची वृत्ती बाळगणारा माणूस मृत्यूनंतरच्या जीवनाला अधिक चांगलं बनवण्याच्या विचारात असतो. आणि मौजमजेची वृत्ती बाळगणारा माणूस केवळ आजच्या जीवनाला चांगलं बनवण्याची काळजी घेत असतो. उदाहरणार्थ परीक्षेची वृत्ती बाळगणाऱ्या माणसामध्ये पैशांच्या बाबतीत समाधानाची वृत्ती आढळेल. तो या बाबतीत त्याच्या आवश्यकतांच्या पूर्तीवर समाधानी होणे पसंत करेल तर मौजमजेचा स्वभाव बाळगणारा माणूस या चिंतेत राहील की जास्त धन त्याला कसं गोळा करता येईल. पैशांची त्याची भूक कधीच संपणारी नसेल. परीक्षेचा विचार करणाऱ्या व्यक्तीकडे जर एक छोटी गाडी असेल आणि कोणी त्याला मोठी गाडी विकत घेण्याचा सल्ला देत असेल तर तो म्हणेल मला माझी परीक्षा वाढवायची नाही. याउलट मौजमजेचा स्वभाव असणारी व्यक्ती या प्रयत्नात राहील की त्याच्याकडे केवळ एकच मोठी गाडी नाही तर बऱ्याच गाड्या असाव्यात.

परीक्षेच्या वृत्तीत जगणारा माणूस निरर्थक मनोरंजनापासून स्वतःला दूर ठेवेल. कारण तो याला स्वतःसाठी लक्ष विचलित करणारी गोष्ट समजेल. या विरुद्ध मौजमजेचा स्वभाव बाळगणारी व्यक्ती मनोरंजनाच्या गोष्टींमध्ये धावून जाईल. मग यात तिचा वेळ आणि पैसा कितीही का वाया जात नाही. परीक्षेची वृत्ती बाळगणारी व्यक्ती प्रत्येक बाबतीत अपव्ययाला अजिबात महत्त्व देणार नाही. ती स्वतःला प्रत्येक बाबतीत सदाचारी मूल्यांच्या बंधनात ठेवेल. याउलट मौजमजेचा स्वभाव बाळगणाऱ्या व्यक्तीचं सगळं लक्ष तिच्या व्यक्तिगत फायद्यांकडे राहील. सदाचाराचा कोणताही उच्च दर्जा तिच्यामध्ये आढळणार नाही.

निर्मात्याच्या निर्माण योजनेनुसार या बाबतीत पूर्ण महत्त्व या गोष्टीस आहे की वेगवेगळ्या परिस्थितींमध्ये माणसांत कोणत्या प्रकारच्या व्यक्तिमत्त्वाची वाढ होत आहे – ईश्वरी व्यक्तिमत्त्वाची का ईश्वराशी संबंध नसलेल्या व्यक्तिमत्त्वाची. सध्याच्या जगात माणूस ज्या पद्धतीने आपल्या शारीरिक अस्तित्वासाठी भौतिक आहार प्राप्त करतो त्याचप्रमाणे आध्यात्मिक

अस्तित्वासाठी सुद्धा त्याला निरंतर आध्यात्मिक आहाराची आवश्यकता असते. याच आध्यात्मिक आहारामुळे त्याच्यात ईश्वरी व्यक्तिमत्त्वाची निर्मिती होते.

आध्यात्मिक आहार म्हणजे काय? आध्यात्मिक आहार म्हणजे माणसासमोर जेव्हा सत्य येते तेव्हा तो त्याला नाकारण्याऐवजी त्याचा स्वीकार करतो मग सत्य प्रस्तुत करणारी व्यक्ती स्वतः त्याच्या परिवारातील असेल किंवा दुसऱ्या परिवारातील. तो वातावरणाच्या प्रभावाखाली विचार न करता अधिक वर जाऊन प्रभावित न होणाऱ्या बुद्धीने आपली भूमिका प्रस्थापित करेल. त्याचं जीवन कृतज्ञतेचं आणि स्वीकृतीचं जीवन असेल, कृतघ्नतेचं आणि अस्वीकृतीचं नाही. तो नकारात्मक अनुभवाचा सुद्धा सकारात्मक तऱ्हेने उत्तर देईल. तो आपल्या मिळालेल्या स्वातंत्र्याला सुद्धा स्वतः लागू केलेल्या नियमांअंतर्गत वापरू लागेल. तो प्रत्येक परिस्थितीत न्यायाची गोष्ट सांगेल, मग न्यायाचं बोलणं खुद्द त्याच्या विरुद्ध जात असलं तरी तो त्याची काळजी करणार नाही. तो या जगाच्या तात्पुरत्या फायद्यांचा विचार न करता परलोकाच्या अनंत फायद्यांना नेहमी आपल्या नजरेसमोर ठेवेल. त्याच्या कृतींचा रोख परलोकाच्या अनंत यशाला प्राप्त करणे असेल, जगाच्या किरकोळ व तात्पुरत्या यशाला प्राप्त करणे नाही.

जे लोक सध्याच्या जगाला स्वतःसाठी परीक्षेचं मैदान समजतील व त्यानुसार आपलं जीवन व्यतित करतील ते परलोकात (जीवनाच्या मृत्यूनंतरच्या काळात) निर्मात्याच्या सान्निध्यातील उद्यानांमध्ये वसवले जातील जेथे ते सदैव राहतील. याउलट जे लोक जगाला केवळ मनोरंजनाचं स्थान समजून जगतील त्यांना अंततः भयानक परिणामांना तोंड द्यावं लागेल. परलोकाच्या शाश्वत जीवनात फक्त संधी गमावल्याचा भाव आणि अपमानजनक शिक्षा याशिवाय त्यांच्या नशिबात काहीही येणार नाही.

# जीवनाचा उद्देश

११ मार्च २००६ ला सायंकाळच्या विमानाने मी हैद्राबादहून दिल्लीला येत होतो. माझ्यासोबत माझ्या सीपीएस्‌चे काही कार्यकर्ते होते. या प्रवासावर नेहा बटवारा नामक एक स्त्रीसुद्धा प्रवास करत होती. सीपीएस्‌चे कार्यकर्ते विमानात इतरांना आध्यात्मिक संदेश देण्याचं कार्य करत होते. याच संदर्भात त्यांनी नेहा बटवारा हिची सुद्धा भेट घेतली व तिला आध्यात्मिक संदेश देणारी काही पत्रके दिली. ही स्त्री दिल्ली विमानतळावर उतरल्यानंतर आपल्या गावी अलवरला निघून गेली. नंतर २८ मार्चला तिचं एक पत्र हैद्राबादहून इमेलद्वारे मला प्राप्त झालं. त्या पत्राचा मजकूर होता –

आदरणीय मौलाना वहीदुद्दीन खान साहेब,

माझं नाव नेहा आहे. मी एम्‌एन्‌सीमध्ये काम करते. पदवीधर झाल्याबरोबर एम्‌एन्‌सीमध्ये उच्च पदावर नोकरी मिळणे यापेक्षा चांगली गोष्ट असू शकत नाही. पण मी खरं सांगतेय मी अधिक उद्देशपूर्ण जीवनाच्या शोधात आहे. म्हणूनच आपल्याला मी हा इमेल पाठवत आहे.

मौलाना, मला माहीत आहे आम्हाला ईश्वराने निर्माण केले आणि आम्हा सर्वांपुढे येथे पृथ्वीवर जगण्याचा एक उद्देश आहे. हा उद्देश पूर्ण झाल्यास ती मृत्यूनंतर स्वर्ग मिळण्यापेक्षाही जास्त समाधानाची बाब ठरेल.

पण मला जीवनाचा हा उद्देश पूर्णपणे कळलेला नाही. मी दिल्लीतील आपल्या आध्यात्मिक वर्गाला येऊ शकले नाही. माझ्या कुटुंबातील लोकांची याला परवानगी नव्हती. आपण माझी अडचण समजू शकता.

** सीपीएस्‌ – Centre for Peace and Spirituality, Delhi (शांती व अध्यात्म केंद्र, दिल्ली)

आपण कोणत्याही प्रकारे मला मदत करू शकलात तर मी जीवनभर आपली कृतज्ञ राहीन. मी सध्या हैद्राबादमध्ये आहे.

सदिच्छेसह.

नेहा बटवारा, सॉफ्टवेअर इंजिनिअर, एम्आइएल्, हैद्राबाद.

फोन: ०४० – २३३०८०९०.

हे पत्र साध्या स्वरूपात केवळ एका स्त्रीचं पत्र नाही. ही हाक आहे प्रत्येक आत्म्याची. हे पत्र जणू प्रत्येक स्त्रीपुरुषाच्या अंतःकरणाचे बोल आहेत. प्रत्येकाच्या जन्मस्वभावाचा हा आवाज आहे. प्रत्येक व्यक्ती एका उद्देशपूर्ण जीवनाच्या शोधात आहे. पण लोकांना वाटतं की त्यांना हे उद्देशपूर्ण जीवन पूर्णपणे मृत्युपूर्व जीवनात मिळावं. मृत्यूनंतरच्या जीवनाची ना त्यांना कल्पना आहे ना ते त्याची वाट पाहण्यासाठी तयार आहेत.

या बाबतीत मूळ प्रश्न हा आहे की माणसाला हे उद्देशपूर्ण जीवन कुठे प्राप्त करायचे आहे – त्याने बनवलेल्या जगात का ईश्वराने बनवलेल्या जगात? उघड आहे की त्याला हे ध्येय ईश्वराने बनवलेल्या जगातच प्राप्त करायचे आहे. कारण त्याने स्वतः बनवलेलं जग तर अस्तित्वातच नाही.

अशा अवस्थेत ही स्वाभाविक गोष्ट आहे की माणसाने सर्वप्रथम हे ओळखायला पाहिजे की ईश्वराने बनवलेल्या जगाचे नियम काय आहेत आणि ते बनवणाऱ्याने त्यांना कोणती निर्माण योजना समोर ठेवून बनवलेले आहे. कारण यांच्या समरूपतेशिवाय कोणत्याही परिस्थितीत तो आपला उद्देश प्राप्त करू शकत नाही.

जर तुमच्याकडे एक चांगली गाडी आहे आणि तुम्हाला ती रस्त्यावर चालवायची आहे तर सर्वप्रथम तुम्हाला या गोष्टीकडे लक्ष द्यावे लागेल की ज्या देशात तुम्ही गाडी चालवू इच्छिता तेथे रस्त्याच्या डाव्या बाजूने गाडी चालवायची असते का उजव्या बाजूने. यशस्वी प्रवासासाठी हे माहीत असणे अत्यंत आवश्यक आहे. जर तुम्ही असं केलंत की ज्या देशाच्या नियमानुसार

गाडी डाव्या बाजूने चालवायची असते त्या ठिकाणी तुम्ही उजव्या बाजूने गाडी चालवू लागलात किंवा जेथे उजव्या बाजूने गाडी चालवण्याचा नियम आहे तेथे डाव्या बाजूने तुम्ही चालवू लागलात तर दोन्ही परिस्थितीत तुम्ही यशस्वी प्रवासापासून वंचित राहाल.

हीच अवस्था जीवनाच्या विशाल प्रवासाची सुद्धा आहे. माणूस आपल्या जीवनाचा प्रवास कुठे अवकाशात किंवा त्याने स्वतः बनवलेल्या जगात करत नाही. तो आपला हा प्रवास ईश्वराने बनवलेल्या जगात करतो. म्हणून प्रत्येक स्त्रीपुरुषासाठी हे आवश्यक आहे की त्याने ईश्वराच्या निर्माण योजनेला समजून घ्यावे आणि तिच्याशी समरूप जीवनाचे नियोजन करावे. असे न केल्यास तो स्वतःला अपयशापासून वाचवू शकत नाही.

स्वतः माणसाचा अनुभव या गोष्टीला समजण्यासाठी पुरेसा आहे. माणसाची ही अवस्था आहे की त्याला तहान लागते. त्याला त्याची तहान भागवायची असते. पण ही उघड गोष्ट आहे की प्रत्येक व्यक्तीला तहान भागविण्यासाठी पाण्याचाच वापर करावा लागतो. पाण्याशिवाय इतर कोणत्याही गोष्टीने ती आपली गरज पूर्ण करू शकत नाही. याचप्रमाणे माणसाला भूक लागते. भुकेच्या बाबतीत सुद्धा माणूस हेच करतो की तो निसर्गाने उपलब्ध करून दिलेल्या आहाराद्वारेच आपली भूक भागवतो. प्रत्येक माणसाला श्वास घेण्यासाठी ऑक्सिजनची गरज आहे. त्याशिवाय तो जिवंत राहू शकत नाही. प्रत्येक व्यक्ती ऑक्सिजन घेण्यासाठी तीच पद्धत अवलंबिते जी निसर्गाने तिच्यासाठी ठेवलेली आहे. हीच अवस्था इतर सर्व गरजांच्या बाबतीत आहे.

अगदी हीच अवस्था जीवनाच्या उद्देशाची सुद्धा आहे. जीवनाच्या उद्देशासाठी सुद्धा माणसाला आपल्या निर्मात्याच्या निर्माण योजनेला ओळखावं लागेल. या बाबतीत माणसापुढे दुसरा कोणता पर्याय उपलब्ध नाही.

कुराण सृष्टीच्या निर्मात्याचं पुस्तक आहे. कुराणात या प्रश्नाचं उत्तर

पाठ क्र. १०३ मध्ये दिलेलं आहे. कुराणाचं उत्तर आहे –

इतिहास साक्षी आहे की माणूस तोट्यात आहे, फक्त त्या लोकांशिवाय जे निर्मात्याने निर्धारित केलेल्या जीवनपद्धतीनुसार जीवन जगतात.

अर्थात ईश्वराने निर्धारित केलेली जीवनपद्धती ओळखून माणसाने त्यानुसार जीवन जगणे अपेक्षित आहे. याशिवाय दुसऱ्या कोणत्याही मार्गाने जाऊन तो फक्त तोट्यातच राहणार आहे. तो मिळालेली जीवनाची संधी वाया घालवण्याशिवाय आणखी काही करू शकणार नाही.

ईश्वराने मानवी जीवनाला दोन भागामध्ये विभाजित केलेले आहे – मृत्युपूर्व जीवनकाल आणि मृत्युपश्चात जीवनकाल. मृत्यूपूर्वीचा काळ कृती करण्याचा काळ आहे आणि मृत्यूनंतरचा काळ केलेल्या कृतीच्या परिणामांना मिळविण्याचा. जे काही मृत्यूनंतर मिळणार आहे ते मृत्यूच्या आधी मिळू शकत नाही. आणि जे काही मृत्यूच्या आधी करायचं आहे ते करण्याची संधी मृत्यूनंतर शिल्लक राहणार नाही.

मानवी अभ्यासावरून असे दिसून येते की प्रत्येक व्यक्ती असंख्य इच्छा घेऊन जन्मास येते. या इच्छा प्रत्येकाला खूप प्रिय असतात. पण ही सुद्धा एक वास्तविकता आहे की पूर्ण मानवी इतिहासामध्ये अगदी एक व्यक्ती सुद्धा आपल्या या इच्छांची पूर्ती करू शकलेली नाही.

वेगवेगळ्या लोकांनी आपल्या इच्छापूर्तीसाठी आयुष्यभर मेहनत घेतली. दिसायला तर त्यांनी मोठमोठे यश मिळविले. पण प्रत्येक जण अशा खिन्न अवस्थेत मरण पावला की तो त्याच्या इच्छा पूर्ण करू शकला नाही. या जगात तो जे सुखासमाधान प्राप्त करू इच्छित होता ते प्राप्त करण्यात तो अपयशी ठरला.

जगाचा अभ्यास हे दर्शवतो की येथे जोडीचा प्रघात आहे. प्रत्येक गोष्ट आपल्या जोडीसह एकत्र होऊन पूर्णत्व प्राप्त करते. ही पद्धत पूर्ण सृष्टीमध्ये आढळते. पृथ्वीपासून ते अवकाशापर्यंत प्रत्येक ठिकाणी हाच परिपाठ

आढळतो. अणूंमध्ये धन व ऋण, वनस्पतींमध्ये पुल्लिंग व स्त्रीलिंग, प्राण्यांमध्ये नर व मादी, मानवांमध्ये स्त्री व पुरुष, इत्यादी.

जोडीची ही पद्धत सर्व निर्मितींमध्ये वैश्विक पातळीवर अस्तित्वात आहे. मात्र या विशाल व परिपूर्ण व्यवस्थेमध्ये एक अपवाद आहे. हा अपवाद आहे मानवी इच्छांचा. प्रत्येक व्यक्ती इच्छांची सखोल भावना घेऊन जन्मास येते पण आपल्या या इच्छांची पूर्ती झाल्याशिवायच ती मरण पावते. या जगामध्ये इच्छा आहेत पण त्यांच्या जोडीला इच्छापूर्ती नाही.

हा प्रश्न जगात येणाऱ्या प्रत्येक स्त्रीपुरुषाचा प्रश्न आहे. प्रत्येक जन्म घेणारा या प्रश्नाचं उत्तर जाणू इच्छितो. पण या आधी की त्याला त्याच्या प्रश्नाचं समाधानकारक उत्तर मिळेल नैराश्याने भरलेल्या अवस्थेत तो या जगातून निघून जातो.

अमेरिकन ख्रिस्ती धर्मप्रसारक बिली ग्रॅहमने लिहिलं आहे की एकदा त्याच्याकडे अमेरिकेच्या एका अब्जाधीशाचा तातडीचा संदेश आला. आपल्या कार्यक्रमांना स्थगिती देऊन बिली ग्रॅहम ताबडतोब त्याच्याकडे रवाना झाला. अमेरिकी अब्जाधीशाच्या घरी तो पोहोचला. त्याला एका खोलीत नेण्यात आले जेथे त्याची भेट त्या अमेरिकी अब्जाधीशाशी झाली. त्या बलाढ्य श्रीमंताने कसलाच उशीर न करता बिली ग्रॅहमला सांगितले –

बघ, मी एक म्हातारा माणूस आहे. जीवनाने सर्व अर्थ गमावला आहे. एका अज्ञात विश्वामध्ये मी निर्णायक झेप घेणार आहे. तरुण माणसा, काय तू मला काही आशेचा किरण दाखवू शकतोस?

बिली ग्रॅहमकडे याचं काही समाधानकारक उत्तर नव्हतं. अमेरिकी अब्जाधीश त्याच्या प्रश्नाच्या उत्तराला वंचित राहूनच मरण पावला. स्वतः बिली ग्रॅहमची सुद्धा ही अवस्था झाली की ताज्या वृत्तानुसार तो एका गंभीर अपघाताचा बळी पडला व अपंगत्वाच्या अवस्थेत अंथरुणावर पडलेला आहे. आणि आपल्या अंतिम परिणाम स्वरूपात मृत्यूची प्रतीक्षा करत आहे.

हीच अवस्था या जगात प्रत्येक स्त्रीपुरुषाची आहे. प्रत्येक जण आपल्या जीवनाचा उद्देश जाणू इच्छितो. प्रत्येक जण एका सर्वसमाधानी जीवनाच्या शोधात आहे. प्रत्येकाची ही इच्छा आहे की त्याला असं जीवन मिळावं ज्यात त्याच्या इच्छांची पूर्णपणे पूर्ती होईल. पण प्रत्येकाचा अंत केवळ अपयशावर होत आहे. घटना सांगतात की प्रत्येक स्त्रीपुरुषाने हा विचार केला की जगाच्या भौतिक वस्तूच वास्तविकता आहेत. प्रत्येकाने भौतिक वस्तू गोळा केल्या आणि त्याद्वारे मनःतृप्तीचं जीवन प्राप्त करण्याचा प्रयत्न केला. पण कसल्याच अपवादाशिवाय एका व्यक्तीला सुद्धा अपेक्षित तृप्ती प्राप्त होऊ शकली नाही.

अशा अवस्थेत मुख्य अडचण ही नाही की या अपयशी अनुभवांचा पुन्हा पुन्हा अनुभव घेत राहायला पाहिजे. या बाबतीत मुख्य अडचण आहे पुन्हा मूल्यमापन करण्याची. आता मुख्य काम आहे गंभीरपणे हा विचार करण्याची की जेव्हा अनुभवांतून हे सिद्ध झालंय की जगात माणूस प्राप्त करू शकलेल्या भौतिक वस्तूंमध्ये माणसाच्या तृप्तीची साधने उपलब्ध नाहीत तर मग मनःतृप्तीची ही साधने कशात आहेत? मानवी इच्छांची प्रक्रिया सातत्याने सुरू आहे. अर्थात हे मानावं लागेल की ती एक वास्तविक गोष्ट आहे. आणि जर ती वास्तविक गोष्ट आहे तर निश्चितपणे तिच्या पूर्तीची साधने या सृष्टीत असायला पाहिजे.

ही बाब प्रवासाच्या उदाहरणावरून समजता येईल. जेव्हा एखादी व्यक्ती प्रवास करते मग ती आगगाडीने करत असेल किंवा विमानाने, तिच्या प्रवासाचे दोन भाग असतात. एक जेव्हा ती प्रवासाच्या अवस्थेत असते व दुसरा जेव्हा ती आपल्या अंतिम स्थळाला पोहोचते. यशस्वी प्रवास होण्याकरता प्रवाशाने या दोन अवस्थेतील फरक लक्षात घेणे आवश्यक आहे. जो प्रवासी या फरकाला लक्षात घेणार नाही तो मनस्तापाचा बळी ठरेल आणि अनावश्यक त्रासात गुरफटून आपली बुद्धी गमावेल.

बुद्धिमान प्रवासी तो आहे जो प्रवासाला प्रवासाप्रमाणे घेईल. प्रवासाला

तो अंतिम स्थळाचे स्वरूप देणार नाही. ही एक स्वाभाविक गोष्ट आहे की प्रवासादरम्यान त्या सोयी उपलब्ध नसतात ज्या अंतिम स्थळास पोहोचल्यावर प्राप्त होतात. पण प्रत्येक प्रवासी हे सहन करतो. कारण त्याला खात्री असते की प्रवासाची अवस्था एक तात्पुरती अवस्था आहे. शेवटी त्याचा प्रवास संपेल आणि तो आपल्या अपेक्षित अंतिम स्थळाला पोहोचेल. अंतिम स्थळाला पोहोचल्यावर त्याला त्या सर्व गोष्टी प्राप्त होतील ज्या त्याला पाहिजे होत्या पण प्रवासादरम्यान तो त्यांना प्राप्त करू शकला नाही.

आपलं सध्याचं जीवन अत्यंत अल्प कालावधीसाठी आहे. या जीवनाचं अत्यंत अल्पावधीसाठी असणे स्वतः या गोष्टीचा पुरावा आहे की ती प्रवासादरम्यानची अवस्था आहे. तो इष्टस्थळाला पोहोचण्याआधीचा टप्पा आहे. यामुळे हे शक्य नाही की सध्याच्या अल्पावधीच्या जीवनात आपल्याला त्या सर्व गोष्टी मिळतील ज्या आपल्याला हव्या आहेत. निःसंशय या गोष्टी आम्हाला मिळतील पण या गोष्टी अंतिमस्थळी पोहोचल्यावर मिळतील. प्रवास सुरू असण्याच्या काळात त्या आम्हाला कदापि मिळणार नाहीत.

हे उघड आहे की आमचं जीवन दोन टप्प्यांमध्ये विभागलेले आहे. मृत्युपूर्व टप्पा आणि मृत्यूनंतरचा टप्पा. मृत्यूपूर्वीचा टप्पा जणू प्रवासाच्या अवस्थेचा टप्पा आहे. आणि मृत्यूनंतरचा टप्पा जणू अंतिम स्थळाला पोहोचण्याचा टप्पा. हीच ती वास्तविकता आहे जिला समजणे प्रत्येक व्यक्तीसाठी आवश्यक आहे. हीच ती वास्तविकता आहे जी प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाला अर्थपूर्ण बनवते. ही वास्तविकता प्रत्येक स्त्रीपुरुषाचा त्या उद्देशाशी परिचय करून देते ज्यामुळे त्यांचे जीवन अर्थपूर्ण बनेल, ज्यामुळे ते संतोष व समाधानाच्या छत्रछायेमध्ये येतील.

जीवनाचं हे स्पष्टीकरण या गोष्टीशी जुळलेलं आहे की मृत्यूनंतर माणसाचा पुन्हा एकदा जन्म होतो. काय मृत्यूनंतर सुद्धा अशाच प्रकारचं जीवन आहे ज्याप्रमाणे मृत्यूपूर्वी आम्ही जीवनाचा अनुभव घेत आहोत? या प्रश्नाचं उत्तर आम्ही अगदी त्याच वैज्ञानिक पद्धतीने मिळवू शकतो ज्या वैज्ञानिक

पद्धतींनी इतर गोष्टींचा अनुभव घेता येतो.

सत्यता पडताळण्याची वैज्ञानिक पद्धत काय आहे? वैज्ञानिक पद्धत म्हणजे ही नाही की ज्या गोष्टीला जाणण्याचा प्रयत्न केला जात आहे त्या गोष्टीने आपल्या पूर्ण स्वरूपात वैज्ञानिकाच्या समोर हजर व्हायला पाहिजे. अशी जर अट असेल तर सर्व वास्तविकता विज्ञानाच्या आधारावर अस्तित्वहीन होऊन जातील. ज्ञानाचा विकास थांबून जाईल. वास्तविक गोष्टींच्या बाबतीत माणूस नेहमीसाठी अंधारातच राहील. कारण कोणतीही वास्तविकता या प्रकारे उजेडात येत नाही की पर्वताप्रमाणे उघड गोष्ट बनून ती समोर यावी.

याउलट घडतं फक्त असं की संशोधनादरम्यान वैज्ञानिकाला एक धागा सापडतो. या धाग्यावर विचार करून तो अशा वास्तविकतेपर्यंत पोहोचतो जी त्याला आधी कधीच माहीत नव्हती. या जगात प्रत्येक वास्तविकता धाग्यादोऱ्यांच्या स्वरूपातच उघडकीस येते. या जगात धागेदोरेच सर्व वास्तविकतांना उजेडात आणण्याचा मार्ग आहेत.

उदाहरणार्थ १३ अब्ज वर्षांआधी महास्फोट झाला व पृथ्वी अस्तित्वात आली (Big Bang Theory) या गोष्टीला विज्ञानात एक वास्तविकता असल्याचे मानले जाते. याचप्रमाणे विज्ञानात असं मानलं जातं की पृथ्वीवर सजीवांच्या उत्क्रांतीची घटना घडली. याचप्रमाणे विज्ञानात हे मानलं जातं की ज्या विश्वात आपण राहतो ते प्रसरण पावत असते, इत्यादी.

या पद्धतीच्या वास्तविकता ज्या आज पूर्णपणे खऱ्या मानल्या जातात त्या या तऱ्हेने वास्तविकता बनल्या नाहीत की माणसाने त्यांचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. फक्त घडलं एवढंच की एक सुगावा माणसाच्या अवलोकनात आला आणि मग या सुगाव्यावर विचार करून मानवी ज्ञान एका मोठ्या वास्तविकतेपर्यंत पोहोचले. ही वास्तविकता प्रत्यक्षात जरी दिसत नव्हती तरी ती अस्तित्वात होती. नंतर तिच्या अस्तित्वाला एका घटनेप्रमाणे मान्य

केलं गेलं जेव्हा की या बाबतीत सुगाव्याशिवाय कोणतीही गोष्ट प्रथमदर्शनी माणसाच्या नजरेत आलेली नव्हती.

हीच अवस्था मृत्यूनंतरच्या जीवनाची अर्थात माणसाच्या पुढील जीवनकालाची आहे. पुढील जीवनकालासंदर्भात सुद्धा स्पष्ट सुगावे उपलब्ध आहेत. या सुगाव्यांवर गंभीरपणे विचार करून आपण या वास्तविकतेपर्यंत पोहोचू शकतो की मृत्यूनंतर सुद्धा जीवन आहे. मृत्यूनंतर सुद्धा सध्याच्या जीवनाप्रमाणेच आणखी एक जीवनाचा टप्पा आहे ज्याला अंतिमतः सर्वांना सामोरे जायचे आहे.

हे सुगावे कोणते आहेत?

उदाहरणार्थ माणसाचं शरीर असंख्य पेशींवर आधारलेलं आहे. या पेशी नेहमी तुटत राहतात. दुसरीकडे शरीरातील पचनव्यवस्था हे कार्य करत राहते की जे काही आपण खातो त्याचे रूपांतर पेशींमध्ये होते. जणू ही पचनव्यवस्था पेशी बनवण्याचा कारखानाच आहे. या व्यवस्थेअंतर्गत असं घडतं की सुमारे प्रत्येक दहा वर्षांत आपलं पूर्ण शरीर अक्षरशः बदलून जातं. नवीन पेशींसह पूर्णपणे एक नवीन शरीर अस्तित्वात येते.

जणू काही आमच्या शरीरावर वेळोवेळी मृत्यू येत असतो. असं असताना सुद्धा आम्हाला दिसतं की माणसाचं बौद्धिक अस्तित्व मेलेलं नाही. ही एक उघड वास्तविकता आहे की बौद्धिक अस्तित्वच माणसाचं खरं अस्तित्व आहे. हे बौद्धिक अस्तित्व शारीरिक मृत्यू होत असताना सुद्धा सातत्याने शिल्लक राहते. हा एक सुगावा आहे जो दाखवतो की माणूस आपल्या मूळ स्वरूपाच्या आधारावर म्हणजे बौद्धिक अस्तित्वाच्या आधारावर एक शाश्वत निर्मिती आहे. याच्या शाश्वत अस्तित्वाचा थोडासा भाग म्हणजे मृत्युपूर्व जीवनाचा टप्पा व उर्वरित पूर्ण भाग म्हणजे मृत्युपश्चात जीवनाचा टप्पा.

याचप्रमाणे या बाबतीत एक सुगावा हा आहे की अपवादात्मक स्वरूपात केवळ माणसांमध्ये न्यायाचं चित्र आढळतं. माणूस आपल्या प्रकृतिगुणाने

ही इच्छा बाळगतो की जगात न्याय प्रस्थापित व्हावे. अर्थात चांगली कृत्ये करणाऱ्यांना चांगला मोबदला मिळावा आणि वाईट कृत्ये करणाऱ्यांना वाईट मोबदला मिळावा. या सुगाव्याला समोर ठेवून विचार केल्यास मानवी बुद्धी या परिणामापर्यंत पोहोचते की सध्याच्या जीवनाचा टप्पा कालावधीच्या बाबतीत खूपच अपुरा असल्याने न्यायाच्या या मागणीची पूर्तता जीवनाच्या पुढील टप्प्यात व्हावी, जीवनाच्या पुढील टप्प्यात प्रत्येक व्यक्तीला त्याच्या कृत्यांप्रमाणे बक्षीस किंवा शिक्षा मिळावी.

याचप्रमाणे या बाबतीत एक सुगावा हा आहे की माणूस जन्मतः एका आदर्श जगाची इच्छा बाळगतो. परंतु या जगाच्या मर्यादा लक्षात घेता येथे अपेक्षित असलेले आदर्श जग बनू शकत नाही. या सुगाव्यावर विचार करत मानवी मन या संशोधनापर्यंत पोहोचते की जे आदर्श जग मृत्युपूर्व जीवनाच्या टप्प्यात त्याच्या मर्यादित अवस्थेमुळे प्राप्त होऊ शकले नाही ते मृत्युपश्चात जीवनाच्या टप्प्यात पूर्णपणे आदर्श स्वरूपात प्राप्त होईल.

याचप्रमाणे या बाबतीत एक सुगावा हा आहे की माणूस हा एकमेव असा प्राणी आहे जो उद्याची संकल्पना बाळगतो. इतर कोणत्याही सजीवांत उद्याचं चित्र आढळत नाही. या सुगाव्याला समोर ठेवून विचार केल्यास ही वास्तविकता उघडकीस येते की सध्याच्या मर्यादित जीवनामध्ये ज्या अपेक्षित जगाला माणूस प्राप्त करू शकत नाही ते त्याला मृत्युपश्चात येणाऱ्या अमर्याद जीवनाच्या टप्प्यात मिळेल. हे जग ते असेल जेथे माणसाला पूर्णपणे तृप्तीचा अनुभव होईल.

मृत्यूनंतर आदर्श जगाची निर्मिती ही अगदी तशीच सिद्ध घटना आहे जशा इतर सिद्ध घटना. म्हणून भविष्याच्या या आदर्श जगात प्रत्येकाला आपोआप जागा मिळणार नाही. फक्त ते स्त्रीपुरुष या आदर्श जगात स्थान मिळवू शकतील ज्यांनी मृत्यूआधीच्या या जगात स्वतःला त्यास पात्र असल्याचे सिद्ध केलेले असेल. हा निसर्गाचा नियम आहे की प्रत्येक पुरस्कार पात्र असलेल्यांना दिला जातो. अपात्र असलेल्यांना कधी कोणता मोठा

पुरस्कार मिळत नाही.

प्रश्न हा आहे की एखाद्या व्यक्तीसाठी स्वतःला या आदर्श जगास पात्र बनवण्याचं सूत्र काय आहे? हे सूत्र केवळ एकच आहे. सूत्र आहे – स्वतःच्या आत्म्याचं शुद्धीकरण.

जी व्यक्ती भविष्याच्या या आदर्श जगात स्वतःसाठी स्थान प्राप्त करू इच्छिते तिला आजच्या या जगामध्ये हा पुरावा द्यावा लागेल की तिने दिसणाऱ्या जगात न दिसणाऱ्या जगाला आपल्या दूरदृष्टीने ओळखले. तिने गोंधळ व संभ्रमांनी भरलेल्या या जंगलात सत्याचा शोध घेतला. तिने नकारार्थी अनुभवांच्या वातावरणात स्वतःला होकारार्थी भूमिकेवर कायम ठेवले. स्वतःला पशूच्या स्तरावरून वर नेत मानवाच्या उच्च स्तरावर उभे केले. तिने कृतघ्नता, अप्रामाणिकपणा, उदंडपणा, स्वार्थ, इच्छा आधीनता, अहंकार यासारख्या क्षुद्र गुणांपासून स्वतःला वाचवले, जी पूर्णपणे मनाने व शरीराने स्वर्गासाठी प्रयत्नशील बनली. थोडक्यात अशी व्यक्ती जिने ईश्वरकेंद्रित जीवनाचा पूर्णपणे अंगीकार केला.

असे गुण बाळगणारे स्त्री व पुरुष मानवजातीची प्रतिकृती आहेत. हेच ते लोक आहेत जे भविष्याच्या आदर्श जगात वसवले जाण्यासाठी निवडले जातील. आणि जे लोक या आदर्शावर स्वतःला सिद्ध करू शकणार नाहीत त्यांच्या मानव असण्याला नाकारून विश्वाच्या कचरापेटीत त्यांना फेकून दिले जाईल. येथे ते नेहमीसाठी नैराश्याचं जीवन व्यतित करतील. ते कधीच या नैराश्यापासून व अपमानास्पद जीवनापासून मुक्ती प्राप्त करू शकणार नाहीत.

# स्वर्ग आणि माणूस

सुमारे १९९८ ची गोष्ट आहे. डॉ. महेशचंद्र शर्मा यांनी दिल्लीच्या एका ज्येष्ठ विद्वानाशी माझी भेट करवून दिली. हे प्राध्यापक नवनिहालसिंग (जन्म १९२३) होते. अमेरिकेहून सेवानिवृत्त होऊन आल्यावर त्यांना येथे राज्यसभेचा खासदार (१९९२-९८) बनविण्यात आले होते. त्यांचं घर एका ग्रंथालयाप्रमाणे दिसत होतं. येथे सगळीकडे अभ्यासाचं वातावरण होतं. ते सर्वार्थाने विद्वान असल्याचे जाणवत होते. भेटीदरम्यान त्यांनी सांगितले की राज्यशास्त्रात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी 'आंतरराष्ट्रीय संबंध' या विषयावर डॉक्टरेट केले होते. त्या काळात अमेरिकेच्या एका विद्यापीठाला या विषयावर एका प्राध्यापकाची गरज होती. विद्यापीठाने दिलेली जाहिरात पाहून प्रा. सिंग यांनी त्यासाठी आपला अर्ज पाठवून दिला. लवकरच त्यांना विद्यापीठाकडून एक पत्र मिळालं ज्यात त्यांना मुलाखतीसाठी अमेरिकेला बोलावण्यात आले होते.

अमेरिकेला पोहोचल्यावर विमानतळावर प्रा. सिंग यांना एक गृहस्थ भेटले व त्यांनी सांगितले की त्यांना विद्यापीठाकडून प्रा. सिंग यांना मार्गदर्शन करण्यासाठी पाठवण्यात आले आहे. यानंतर ते गृहस्थ प्रा. सिंग यांना आपल्या गाडीमध्ये विद्यापीठात घेऊन आले. विद्यापीठाच्या अतिथिगृहात प्रा. सिंग यांना थांबवण्यात आले.

यानंतर ते गृहस्थ दररोज प्रा. सिंग यांच्याकडे यायचे व त्यांना घेऊन सकाळपासून संध्याकाळपर्यंत विद्यापीठातील विशाल परिसरात फिरवत राहायचे. अशा प्रकारे ते प्रा. सिंग यांना विद्यापीठातील प्रत्येक विभागात घेऊन गेले आणि विद्यापीठाच्या प्रत्येक उपक्रमात सहभागी केले. जसे, ग्रंथालय, भोजनगृह, शाळेचे वर्ग, शिक्षकांचे क्लब, विद्यार्थ्यांच्या सभा, विद्यापीठाचा कर्मचारिवर्ग इत्यादी.

अशा प्रकारे एक आठवडा निघून गेला. प्रा. सिंग चिंतित झाले. त्यांनी विभागाच्या अध्यक्षाची भेट घेतली व त्यांना सांगितले की मी एका आठवड्यापासून येथे आहे, मला मुलाखतीसाठी बोलावण्यात आले होते पण अद्याप माझी मुलाखत घेण्यात आलेली नाही. अध्यक्षाने त्यांना सांगितलं की आपली मुलाखत घेतली गेली आहे. आम्ही आपली निवड केली आहे. आणि आता आपण उद्यापासून आमच्या येथे कार्यरत होऊ शकता. यानंतर अध्यक्षांनी स्पष्ट केलं की विमानतळावर आमची जी व्यक्ती आपल्याला भेटली ती येथील वरिष्ठ प्राध्यापक आहे आणि तीच आपली मुलाखत घेणार होती.

अध्यक्षांनी सांगितलं की आपण पाठवलेल्या कागदपत्रांना पाहिल्यानंतर आम्हाला कळलंच होतं की जेथपर्यंत आपल्या शैक्षणिक पात्रतेचा संबंध आहे आपण पदासाठी पूर्णपणे पात्र उमेदवार आहात. फक्त आपण आमच्या विद्यापीठाच्या सांस्कृतिक दर्जावर स्वतःला पूर्णपणे सिद्ध करू शकता का हे आम्हाला पाहायचं होतं. आपली मुलाखत घेणारी सदरील व्यक्ती हेच काम करत होती. ती आपल्याला विद्यापीठाच्या प्रत्येक विभागात घेऊन गेली. तेथील सर्व उपक्रमांशी आपला परिचय करून दिला. विद्यार्थी आणि शिक्षक दोघांबरोबरच्या आपल्या व्यवहाराला पाहिलं. या दरम्यान ती व्यक्ती आपल्या प्रत्येक गोष्टीचे बारकाईने निरीक्षण करत होती. मुलाखतकाराचा अहवाल आपल्याबद्दल पूर्णपणे सकारात्मक आहे. आपला व्यवहार लक्षात घेता आम्ही आपली निवड केली आहे. आपल्याला उद्यापासून येथे कार्य सुरू करता येईल.

ही घटना एक वास्तविक उदाहरण आहे ज्यावरून स्वर्ग आणि माणूस यांची अवस्था स्पष्ट होते. ईश्वराने एक विशाल जग बनवलं – स्वर्गाचं जग. हे जग सर्वार्थाने एक परिपूर्ण जग होतं. येथे प्रत्येक वस्तू उच्च आदर्शाच्या पातळीवर होती. ईश्वराला वाटलं की या परिपूर्ण जगात त्याने अशा लोकांना वसवावं जे आपल्या चारित्र्याच्या बाबतीत या ठिकाणास पूर्णपणे पात्र असतील. जे या आदर्श जगात आदर्श व्यक्तींप्रमाणे राहू शकतील.

मग ईश्वराने या जगाचा परिचय करून देण्यासाठी सध्याचा पृथ्वी हा ग्रह बनवला. येथे त्या सर्व गोष्टी आढळतात ज्या स्वर्गाच्या जगामध्ये उपलब्ध आहेत. फरक केवळ हा आहे की स्वर्गाचे जग आदर्श जग आहे. आणि

सध्याचे पृथ्वीवरील जग आदर्श जग नाही. स्वर्गाचे जग परिपूर्ण आहे आणि सध्याचे पृथ्वीवरील जग अपूर्ण. स्वर्गाचे जग चिरकालीन आहे आणि सध्याचे पृथ्वीवरील जग नष्ट होणारे. स्वर्गाचे जग सर्व प्रकारच्या भय व त्रासापासून मुक्त आहे तर पृथ्वीवरील जग अशा गोष्टींनी भरलेले आहे. स्वर्गाचे जग पुरस्काराचे जग आहे व सध्याचे जग परीक्षेचे जग.

या योजनेनुसार ईश्वराने माणसाला निर्माण करून त्याला सध्याच्या पृथ्वीवरील जगात वसवले. ईश्वराने माणसाला पूर्ण स्वातंत्र्य दिलं. त्याने माणसाला ही संधी दिली की तो येथे बंधनाशिवाय राहू शकतो. तो आपल्या स्वातंत्र्याला हवं तर चुकीच्या प्रकारे वापरू शकतो किंवा हवं तर योग्य प्रकारे वापरू शकतो. प्रत्येक व्यक्ती जी या पृथ्वीवर जन्म घेते तिच्यासोबत ईश्वराचे दोन अदृश्य ईशदूत नेहमी उपस्थित असतात. ते तिच्या प्रत्येक उक्ती व कृतीची पूर्ण नोंद करत असतात. याच नोंदीच्या आधारावर तिच्यासाठी पुढील जगामध्ये स्वर्ग किंवा नरकाचा निवाडा होईल.

स्वर्गाच्या जगात माणूस पूर्ण स्वातंत्र्यासह राहील पण तो इतका जास्त परिपक्व आणि सुजाण झालेला असेल की तो कोणत्याही परिस्थितीत आपल्या स्वातंत्र्याचा दुरुपयोग करणार नाही. तो पूर्णपणे स्वतंत्र असून सुद्धा पूर्णपणे शिस्तीत राहील. हीच ती व्यक्ती आहे जिच्या निवडीसाठी सध्याचा पृथ्वी हा ग्रह बनवण्यात आला. सध्याच्या जगात सुद्धा त्या सर्व अवस्था आढळतात ज्या स्वर्गाच्या जगात उपलब्ध असतील. आता हे पाहिलं जात आहे की ती कोण व्यक्ती आहे जिने प्रत्येक प्रकारच्या अवस्थेतून जाताना स्वर्गीय चारित्र्याचा पुरावा दिला. अशाच व्यक्तींची निवड करून त्यांना स्वर्गीय जगामध्ये शाश्वत स्वरूपात वसवले जाईल.

प्रत्येक व्यक्तीबरोबर ईश्वराचे अदृश्य ईशदूत जोडीला आहेतच. आणि ते प्रत्येक क्षणी सर्व गोष्टींची नोंद करत आहेत. हीच मानवाची परीक्षा आहे आणि याच परीक्षेच्या निकालाच्या आधारावर प्रत्येक व्यक्तीच्या भविष्याचा निवाडा होणार आहे. ही परीक्षा म्हणजे माणसाने प्रत्येक वेळेवर ईश्वराच्या महानतेची साक्ष द्यायला पाहिजे. अर्थात जेव्हा त्याच्या अंतर्मनाने त्याला रोखले तेव्हा त्याने अंतर्मनाच्या सूचनेकडे लक्ष दिलं का त्याकडे दुर्लक्ष

केलं. जेव्हा त्याच्यासमोर पुराव्यासह एक वास्तविकता आली तेव्हा तो त्यापुढे नतमस्तक झाला का त्या बाबतीत स्वतःचा हट्टीपणा दाखवला. जेव्हा त्याच्यातील अहंकाराचा सामना सत्याशी झाला तेव्हा तो अहंकारामागे धावला का त्याने सत्याचा स्वीकार केला.

याचप्रमाणे लोकांशी व्यवहार करताना तो न्यायाच्या बाजूने उभा राहिला का स्वार्थासाठी अन्यायाची बाजू घेतली. तो केवळ लोकांसमोर चांगला बनून राहिला का आपल्या व्यक्तिगत जीवनात सुद्धा चांगुलपणावर टिकून राहिला. सत्य त्याच्यासाठी महत्त्वाचा विषय होता का इतर गोष्टींना त्याच्याकडे जास्त महत्त्व होतं. याचप्रमाणे जेव्हा तो सत्तेत आला तेव्हा त्याने स्वतःला न्यायावर टिकवून ठेवले का सत्तेच्या विकृतीला तो बळी पडला. गरीब असताना तो कसा वागला व सधन झाल्यावर कसा वागला. दोन्ही परिस्थितीत त्याचा व्यवहार संतुलित होता का परिस्थिती बदलल्यावर त्याचा व्यवहार बदलला. सामाजिक जीवनात समोरचे स्थान मिळाल्यावर तो कसा होता व मागचे स्थान मिळाल्यावर त्याची प्रतिक्रिया काय होती. त्याने आपल्या भावना आणि इच्छांना नियंत्रणात ठेवले होते का तो त्यांच्यामागे धावत होता. याच नोंदींच्या आधारावर प्रत्येक स्त्री आणि पुरुषाच्या चिरकालीन भविष्याचा निवाडा होणार आहे.

सध्याचे पृथ्वीवरील हे जग एका मर्यादित अवधीसाठी बनविण्यात आले आहे. हा अवधी पूर्ण झाल्यावर येथे जगलेले सर्व लोक ईश्वरासमोर उपस्थित केले जातील. ईश्वर त्याच्या ईशदूतांनी बनविलेल्या अहवालानुसार प्रत्येकाच्या भविष्याचा निवाडा करेल. ज्या स्त्रीपुरुषांच्या अहवालातून हे दिसेल की ते पृथ्वी या ग्रहावर स्वर्गीय चारित्र्यासह राहिले, आपल्या स्वातंत्र्याला ईश्वराने ठरविलेल्या मर्यादेमध्ये वापरले, स्वर्गीय जगाच्या वातावरणात वसवले जाण्यास स्वतःला पात्र सिद्ध केले अशा लोकांना स्वर्गाच्या बागेत राहण्यासाठी निवडले जाईल. याशिवाय ते सर्व लोक जे स्वर्गीय चारित्र्याचा पुरावा देऊ शकले नाहीत त्यांना नाकारून सृष्टीच्या चिरकालीन कचरापेटीत टाकून दिले जाईल. ते नेहमीसाठी निराशा आणि अपमानाचे जीवन व्यतित करतील व त्यापासून कधीच ते मुक्ती मिळवू शकणार नाहीत.